# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.



Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)



१९ सप्टेंबर, २०१९


# स्वत:च्या आईचा खुन करणाऱ्या आरोपीस आजन्म कारावासाची शिक्षा

पोलीस स्टेशन माजरी अंतर्गत स्वत:च्या आईचा खुन करणाऱ्या आरोपीस १८/०९/२०१९ रोजी **श्री. डी. के. भेंडे, सत्र न्यायाधीश वरोरा जि. चंद्रपुर यांनी** शिक्षा ठोठावली.

पोलीस स्टेशन माजरी अंतर्गत मौजा राळेगाव येथील फिर्यादी यांनी दिनांक ११/०६/२०१७ रोजी तक्रार दिली होती की, त्यांचे घराशेजारील राहणारी महिला आणि त्यांचा मुलगा यांच्यात घराच्या जागेच्या हिस्स्यावरून वाद सुरू होता. हिस्सेवाटणीच्या वाद एके दिवशी संतापल्याने **आरोपी मुलगा नामे गजानन जनार्धन वानखेडे वय ३५ रा. राळेगाव,** याने रागाच्या भरात आपल्या आईला मारपीट करून जिवानिशी ठार केले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन बल्लारशाह येथे अप.क्र. १९६/२०१७ कलम ३०२ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोउपनि. श्री. सैयद अहमद सैयद उस्मान पोलीस स्टेशन माजरी यांनी पुर्ण करून गुन्हयातील आरोपींविरूद्‌ध सबळ पुराव्यानिशी न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले.

न्यायालयाचे सुनावणी दरम्यान सदर प्रकरणात न्यायालयाने साक्षीदार तपासले व योग्य पुराव्याच्या आधारे दिनांक १८/०९/२०१९ रोजी **आरोपी मुलगा नामे गजानन जनार्धन वानखेडे वय ३५ रा. राळेगाव, यास कलम ३०२ भादंवि मध्ये आजन्म कारावासाची शिक्षा व ५,०००/—रू दंड न भरल्यास ३ महिना शिक्षा श्री. डी. के. भेंडे, सत्र न्यायाधीश वरोरा जि. चंद्रपुर यांनी** ठोठावली आहे. सदर प्रकरणामध्ये सरकार तर्फे **ॲड. गोविंदा उराडे, सरकारी अभियोक्ता, चंद्रपूर** आणि कोर्ट पैरवी म्हणुन सफौ. अशोक चेंडे पोस्टे माजरी यांनी काम पाहिले.

---